# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१३५/२२/त.क्र.३०/२५/०१**

**श्री. अमित शिंदे**
३७७, राम मंदिर रोड,
खार (प.) मुंबई-४०००५२

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०८.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार आज दि.२२.०८.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एच/पश्चिम विभाग, श्री. राजेश कृष्णा जंगम व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एच/पश्चिम विभाग, श्री. नूतन जाधव उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग अनुपस्थित आहेत.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, श्री अमित शिंदे यांनी दाखल केलेल्या दि.०९.०३.२०२२ रोजीच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ अंतर्गत तक्रार अर्जावर द्वितीय अपील क्र.१२५३/२१, १२५४/२१ व १२५६/२१ यात माहिती देण्याचा आदेश असतानाही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एच/पश्चिम विभाग खार यांनी केवळ एकच माहिती दिली असून दिशाभूल केली असल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. अपील क्र.१२५३/२१, १२५४/२१ व १२५६/२१ यातील आदेशाचे अवलोकन केले असता यात हिंजवड येथील परवानाधारका संदर्भातील माहिती असून उपलब्ध असलेली व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(च) नुसार देय असलेली माहिती या आधीच तक्रारदार यांना स्पीड पोस्टद्वारे देण्यात आली

असून दाखल केलेल्या तक्रार अर्ज हा तथ्यहीन असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एच/पश्चिम विभाग श्रीम. नूतन जाधव यांनी आज उपस्थित राहून नमूद केलेले आहे. याप्रकरणी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही मा. आयोगाने अपील क्र.१२५३/२१, १२५४/२१ व १२५६/२१ तक्रारदार यांना याआधीच प्रदान करण्यात आली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता दाखल केलेल्या तक्रार अर्ज हा तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २२.०८.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra